रजिस्टर नंबर पुक्षे/पंसप/पुपूमं/सा/२०४,
२००६-२००८/एलडब्ल्यूपी-१९६;
क्रमांक पीएचएम/एसआर-१९२/VIII/२००१.

किंमत : रुपये ९.००

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

क्रमांक ८] गुरुवार, दिनांक ६ मार्च २००८ : फाल्गुन १६, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

भाग एक-अ—पुणे विभागीय पुरवणी

(भाग ४-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ पुणे विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)

टीप.—प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.

१

पुणे महानगरपालिका मिळकत/जागा वाटप नियमावलीस मान्यता देण्याबाबत.

नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक २१ फेब्रुवारी २००८

शासन निर्णय क्रमांक पीएमसी-३००५/२१९४/प्र. क्र. १५७/०५/नवि-२२

वाचा.--(१) आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे पत्र क्रमांक एलईओ/९१८, दिनांक ३० मे २००५ व त्यासोबतचा स्थायी समिती ठराव क्रमांक ३७, दिनांक २४ नोव्हेंबर २००४, महासभा ठराव क्रमांक २४६, दिनांक २२ डिसेंबर २००४.

(२) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र क्रमांक एलईओ/३६०९, दिनांक १२ ऑक्टोबर २००६.

(३) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र क्रमांक एलईओ/५२३३, दिनांक २९ नोव्हेंबर २००६.

(४) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र क्रमांक एलईओ/५५५६, दिनांक २० डिसेंबर २००६.

(५) आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे पत्र क्रमांक एलईओ/२३७, दिनांक १० एप्रिल २००७.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७९ मध्ये महानगरपालिकांच्या मिळकती/जागा यांचे वाटप करण्याबाबतची तरतूद आहे. या तरतुदी अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या विविध बांधकाम असलेल्या जागा/खोल्या/इमारती या व्यक्ती अथवा संस्था यांना अल्प मुदतीच्या/दीर्घ मुदतीच्या कराराने तसेच प्रिमियम रक्कम स्वीकारून कराराने अथवा विकत दिल्या जात असत. त्याबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक १०२/२००१ अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन, पुणे महानगरपालिकेने, महानगरपालिकेच्या मिळकत वाटपाची नियमावली तयार करून त्यास स्थायी समिती, महासभेची मान्यता घेऊन, पूर्वप्रसिद्धी देवून शासनास सदर नियमावली संदर्भाधीन पत्रान्वये मान्यतेसाठी सादर केली होती. या नियमावलीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

पुणे महानगरपालिका महासभा ठराव क्रमांक २४६, दिनांक २२ डिसेंबर २००४ अन्वये मान्य केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या बांधलेल्या जागा, मिळकती, व्यक्ती अगर संस्था यांना वाटप करण्याबाबत शासनास सादर केलेल्या नियमावलीत काही फेरफार/बदल करून, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७९, ४५४, ४५५ मधील तरतुदीस अनुसरून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर नियमावली "पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली-२००८" म्हणून ओळखली जाईल.

३. शासनाकडून मान्य केलेल्या नियमावलीची प्रमाणित प्रत सोबत जोडली आहे.

४. सदर नियमावली आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी शासन राजपत्रात प्रसिद्ध करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

फ. ब. खान,

उपसचिव, महाराष्ट्र शासन.

महापालिका आयुक्त यांजकडून

पुणे महानगरपालिका

क्रमांक म. आ./एलईओ/८५३२/२००८.--

संदर्भ.--(१) मा. पुणे महानगरपालिका सभा ठराव क्रमांक २४६, दिनांक २२ डिसेंबर २००४.

(२) शासन पत्र क्रमांक पीएमसी/२००५/२१९४/प्र. क्र. १५७/०५/नवि-२२, नगरविकास विभाग, दिनांक १५ जून २००६.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अंतर्गत कलम ७९, ४५४, ४५५ अन्वये प्राप्त अधिकारात तयार केलेली महानगरपालिका मिळकती नियमावली २००८.

भाग १

प्रारंभिक

१. शीर्षक, व्याप्ती व प्रारंभ

(अ) या नियमावलीस पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ असे संबोधिले जाईल.

(ब) या नियमावलीतील नियम, पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या, तसेच ताब्यातील सर्व भाग-२ मधील मिळकत या व्याख्येत नमूद मिळकतींना लागू राहतील.

(क) सदर नियमावलीतील नियम हे शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून लागू होतील.

२. संज्ञा/व्याख्या

(१) **महानगरपालिकेच्या मिळकती.**--महानगरपालिकेच्या मिळकतीमध्ये पुढील मिळकतींचा समावेश होईल.

(१) महानगरपालिकेच्या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या प्राथमिक-माध्यमिक शाळा, दवाखाने, भाजी मंडई, व्यावसायिक इमारती व गाळे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन आर्थिकदृष्ट्या दुर्बल व तत्सम घटकांचे पुनर्वसन यासाठी झोपडपट्टी सुधारणा अधिनियम, १९७८ तसेच विकास योजना नियंत्रण नियमावलीनुसार महापालिकेस प्राप्त झालेले १५ टक्के निवासी गाळे.

(३) विकास योजना आराखड्यातील आरक्षित झोनमधील मान्य डी. सी. नियमावलीनुसार उपलब्ध झालेले १५ टक्के बांधीव गाळे.

(४) विकास योजना नियमावलीनुसार आराखड्यातील आरक्षणामधील महापालिकेस उपलब्ध झालेल्या शाळा, दवाखाने इत्यादी बांधकाम असलेल्या इमारती.

(५) पुणे शहरामधील व लगतच्या गावाचे गावठाणातील गल्ल्या, बोळ, वहिवाटीचे रस्ते यांची मालकी महाराष्ट्र शासनाची असून ते/त्यांची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिकेकडून करण्यात येते. सदर गल्ल्या, बोळ इत्यादींचा विनियोग/वाटप या नियमावलीनुसार महापालिकेस करता येणार नाही.

(६) महानगरपालिका हद्दीमधील नदी, नदीपात्रांच्या जागा, नाले, ओढे, तसेच नाला व नाल्यामधील पडक्षेत्र यांची मालकी शासनाकडे आहे. त्यामुळे सदर जागेचा विनियोग शासनाचे परवानगीशिवाय महापालिकेस करता येणार नाही.

(२) **विस्थापित व्यक्ती/कुटुंबे**

महानगरपालिकेच्या विविध विकास व सार्वजनिक हेतूच्या प्रकल्पासाठी संपादन करण्यात आलेल्या मिळकतींवरील विस्थापित निवासी, वर नमूद केलेल्या व्यक्तीकडे त्यांचे वापरासाठी असणारी मिळकत संपादन करण्यात आली असल्याचा कागदोपत्री पुरावा भूसंपादनाची नोटीस, ताबेपावती पूर्वीच्या जागेची भाडेपावती, वीज बिल, रेशन कार्ड सादर करणे आवश्यक राहील. तसेच तडजोडीने जागा ताब्यात आली असल्यास मूळ मालकाने भाडेकरूचा अतिरिक्त चटई निर्देशांक वापरणार नसल्याचे हमीपत्र देणे अनिवार्य असेल. तसेच विस्थापित व्यक्ती/कुटुंबाकडे संपादन करण्यात आलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र कोणत्याही प्रकरणी मालकी हक्काची अथवा भाडेकराराची जागा नसल्याचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. अंध अपंग व्यक्ती

(१) ज्या व्यक्तीकडे अपंग व्यक्ती, (समानसंधी संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम, १९९५ मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गाचे) अपंगत्व, किमान ४० टक्के आहे अशा सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणपत्र दिलेल्या व्यक्ती.

(२) ज्या व्यक्ती अपंग आहेत व ज्यांना शासकीय धोरणाखाली कोणत्याही प्रकारचा लाभ देण्यात आलेला नाही, असे शासनाचे समाजकल्याण विभागाने प्रमाणपत्र दिलेल्या व्यक्ती.

(३) ज्या व्यक्तीचे सर्व कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न शासन वेळोवेळी जाहीर करेल, त्या मर्यादेपेक्षा अधिक नसल्याचा तहसिलदार यांनी दाखला दिलेल्या व्यक्ती.

(४) ज्या जागेची मागणी करण्यात आलेली आहे, अशा जागेच्या परिसरापासून २ कि. मी. अंतरापेक्षा अधिक दूर निवासस्थान नसलेल्या अंध, अपंग व्यक्ती.

४. माजी सैनिक

(१) ज्या व्यक्तींना केंद्रीय संरक्षण विभागाने सेवानिवृत्त झाल्याचे प्रमाणपत्र दिले असेल अशा व्यक्ती.

(२) युद्ध वा तत्सम आपत्तीमुळे ज्या व्यक्ती केंद्रीय संरक्षण विभागात काम करून शकत नसल्याचे संरक्षण विभागाने प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व्यक्ती.

(३) वर नमूद केलेल्या संरक्षण विभागातील व्यक्तींच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न शासन वेळोवेळी जाहीर करेल, त्या मर्यादेपेक्षा अधिक नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती.

(४) ज्या माजी सैनिकांविरुद्ध संरक्षण विभागाकडून कोर्ट मार्शल व तत्सम स्वरूपाची कारवाई करण्यात आली असेल अशा व्यक्ती अपात्र समजण्यात येतील.

५. अनुसूचित जाती व जमाती व इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती

(१) शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गात असल्याचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे अशा व्यक्ती.

(२) वरील प्रवर्गातील व्यक्तीचे एकूण कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न शासन वेळोवेळी जाहीर करेल त्या मर्यादेपेक्षा अधिक नसल्याचे तहसिलदाराने/सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिलेल्या व्यक्ती.

(३) या प्रवर्गातील ज्या व्यक्तींना शासनाच्या संजय गांधी व तत्सम निराधार योजनेखाली कोणतेही अनुदान प्राप्त न झाल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असणाऱ्या व्यक्ती.

६. निराधार व परित्यक्ता महिला

(१) ज्या महिला घटस्फोटीत अथवा परित्यक्या असून उपजीविकेसाठी त्यांना कोणतेही साधन उपलब्ध नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या महिला.

(२) ज्या परित्क्त्या महिलांना शासनाच्या कोणत्याही निराधार योजनेचा लाभ देण्यात आला नसल्याचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या स्त्रिया.

७. शैक्षणिक व सामाजिक संस्था

(१) धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत संस्था.

(२) ज्या शैक्षणिक संस्थांना शासनाचे नियमानुसार संस्था चालविण्याचे प्रमाणपत्र दिले असेल अशा शैक्षणिक संस्था.

(३) ज्या संस्थांनी जागा मागणी दिनांकापूर्वी किमान पाच वर्षात केलेल्या सामाजिक कार्याचा अहवाल व सक्षम अधिकाऱ्यांकडून तपासलेला आर्थिक ताळेबंद अहवाल सादर केलेला असेल अशा संस्था.

(४) ज्या सामाजिक संस्था व्यावसायिक गाळ्यांची मागणी करतील त्यामध्ये रस्तारुंदीमुळे विस्थापित व्यक्ती, आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्ती, निराधार व परित्क्या महिला, अनुसूचित जाती-जमातीमधील व्यक्ती या प्रवर्गातील एकूण ५० टक्के आरक्षित असलेल्या लाभार्थींची आवश्यक त्या कागदपत्रांसह व्यक्तींची यादी सादर करणाऱ्या संस्था.

८. संयुक्त प्रकल्प

(१) महानगरपालिकेच्या ताब्यात विविध कारणासाठी आलेल्या जागेवर, जागेचे आरक्षणानुसार अथवा महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार एखादा प्रकल्प महानगरपालिकेस स्वबळावर राबविणे शक्य नसल्यास, महानगरपालिकेची जागा आरक्षित कारणासाठी एखादी व्यक्ती अगर संस्थेस उपलब्ध करून देवून संस्थेच्या अथवा व्यक्तीच्या सहकार्याने महानगरपालिकेसोबत संयुक्तपणे राबविण्यात येणारे प्रकल्प.

९. या नियमात उल्लेखित अन्य सर्व संज्ञा/व्याख्या या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच असतील.

भाग ३

जागा वाटपासंबंधीचे अधिकार

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७९ अन्वये

(१) ज्या मिळकतींचे मूल्य रुपये ५०० पेक्षा आणि शासनाचे मान्यतेने महानगरपालिकेने निश्चित केलेल्या मूल्यापेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही स्थावर मालमत्तेचे वाटप भाडे.

(२) मासिक भाडेकराराव्यतिरिक्त व ज्यांचे भाडे रुपये ३००० पेक्षा अधिक आहे, अशा मिळकतींचे वाटप/विनियोग महानगरपालिका आयुक्त यांनी केल्यास, असा भाडेकरार झाल्यापासून १५ दिवसांचे आत ही बाब स्थायी समितीचे निदर्शनास आणून मान्यता घेणे आवश्यक आहे.

(३) ज्या मालमत्तेचे बाजारमूल्य रुपये ५००० पेक्षा अधिक नसेल अशा मिळकती भाडेकराराने स्थायी समितीची मान्यता घेऊन त्यांचा विनियोग महानगरपालिका आयुक्त यांना करता येईल.

(४) तसेच कोणतीही स्थावर मालमत्ता १ वर्षाचे कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देतांना अथवा ज्या मिळकतीचे चालू बाजारमूल्य रुपये ५०,००० पेक्षा अधिक नसेल अशी महानगरपालिका स्थावर मालमत्ता स्थायी समितीचे मंजुरीने विकता येईल किंवा भाडेपट्ट्याने देता येईल.

(५) महानगरपालिकेची कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता महानगरपालिकेच्या मंजुरीने, किमान चालू बाजारभावाने भाडेपट्टा अथवा विक्री करून देण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

(६) कोणतीही स्थावर मालमत्ता भाडेकराराने हस्तांतरित करताना घ्यावयाचे भाडे/प्रिमियम रक्कम मिळकतीचे अधिमूल्य, भाडे किंवा अन्य मोबदला यांची प्रचलित मूल्यनिर्धारण सूचीतील चालू बाजार किंमत अथवा ती जागा संपादित करणेकरीता आणि विकसित करणेकरिता आलेल्या खर्चाची एकूण बेरीज यापैकी जी जास्त असेल त्या रकमेपेक्षा कमी असणार नाही.

(७) प्रिमियमची रक्कम ठरविताना ते पुढील निकषावर ठरविली जाईल. जागेची संपादित केलेली वर्षाची किंमत + ताबा दिनांकापासून ते टेंडर दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी १२.५ टक्के व्याज + विकसन खर्च अशी प्रिमियमची रक्कम राहील. तसेच भाड्याबाबत दोन पर्याय राहतील. (१) प्रिमियमच्या रकमेच्या २.५ टक्के भाडे दरवर्षी, ३० वर्षापर्यंत राहील. (२) ३० वर्षाचे भाडे एकरकमी भरण्यास तयार असल्यास दरवर्षीचे भाडे × १००/८ या सुत्राद्वारे होणारी रक्कम एकरकमी भरावी लागेल. तसेच दरवर्षी रुपये १ हे नाममात्र भाडे महानगरपालिकेच्या स्वामित्वापोटी भरावे लागेल.

भाग ४

कोणत्या मिळकतीचे वाटप करता येईल

४. या नियमानुसार खालील मिळकतींचे वाटप करता येईल

(१) या नियमावलीच्या भाग २ मध्ये महानगरपालिकेच्या मिळकती या संज्ञेत समाविष्ट ज्या मिळकती महापालिकेच्या मालकीच्या व ताब्यात आहेत अशा मिळकती.

(२) शासनाच्या मालकीच्या मिळकती मात्र हस्तांतरण शर्तीविरुद्ध अथवा शासनाचे पूर्वपरवानगी व्यतिरिक्त या मिळकती वाटप/विनियोगासाठी पात्र होणार नाहीत.

(३) शासनाच्या मालकीच्या गल्ल्या, बोळ, वहिवाटीचे रस्ते, नाले, नदीपात्रामधील जागा-पडजागा वाटप/विनियोगासाठी पात्र होणार नाहीत.

(४) महानगरपालिकेच्या मिळकतीमधील इमारतीच्या सामासिक अंतरापैकी मोकळी जागा विक्री अथवा भाडेपट्ट्याने देता येणार नाही.

(५) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन योजनेअंतर्गत जे निवासी बांधिव गाळे महानगरपालिकेच्या ताब्यात मालकी हक्काने आले असतील अशा गाळ्यांचा विनियोग रस्तारुंदी व तत्सम विकास योजनेच्या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या/ट्रान्झिट कॅम्प झोपडपट्टीधारकास भाडेपट्ट्याने वापर करता येईल.

(६) महानगरपालिकेच्या मिळकतींवर व्यावसायिक इमारत बांधण्यात आली असेल तर या इमारतीमधील गाळ्यांचा विनियोग भाडेकराराने करता येईल.

(७) महानगरपालिकेच्या शाळांच्या इमारतीमधील ज्या वर्ग खोल्या विनावापर असतील व शिक्षण मंडळास अशा वर्ग खोल्यांची आवश्यकता नसेल तर त्या शैक्षणिक संस्थेस भाडेकराराने देता येतील.

(८) महानगरपालिकेचा महसूल वाढविण्याचे दृष्टिकोनातून जाहीर निविदा मागवून महानगरपालिकेच्या ताब्यातील व्यावसायिक इमारतीमधील गाळे, वाहनतळ व तत्सम बांधिव क्षेत्र इत्यादी यांचे वाटप करण्यात येईल.

(९) महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा अधिनियमाखालील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले निवासी गाळे विकास योजना प्रकल्पामुळे वा रस्तारुंदीमुळे बाधित झालेल्या कुटुंबांचे व झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसनासाठी भाडेपट्टा करारनाम्याने देण्यात येतील.

भाग ५

विनियोगाचा प्राधान्य क्रम

५. महानगरपालिकेच्या ताब्यातील पुनर्वसनासाठी निवासी व व्यावसायिक गाळे प्राधान्याने पुढील व्यक्तीस प्राधान्याने देण्यात येतील.

(१) **मागासवर्गीय व्यक्ती.**--अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमाती आणि इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग इत्यादी आरक्षित प्रवर्गातील व्यक्तींनी पुनर्वसन योजनेखाली बांधण्यात आलेल्या व्यावसायिक गाळ्यांची मागणी केल्यास संबंधित व्यक्तीस जागा भाडेकराराने देता येईल.

(२) **विस्थापित व्यक्ती.**--रस्ता-रुंदी अथवा विकास योजना प्रकल्पामुळे ज्या व्यक्ती विस्थापित झालेल्या असतील अशा व्यक्तींनी पुनर्वसन योजनेखाली बांधण्यात आलेल्या निवासी अथवा व्यावसायिक गाळ्यांची मागणी केल्यास संबंधित जागा भाडेकराराने देता येईल.

(३) **अंध, अपंग व्यक्ती.**--अंध, अपंग व्यक्ती समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण अधिनियम, १९९५ मध्ये नमूद प्रवर्गातील यांच्या व्याख्येनुसार पात्र व्यक्तीस अथवा त्यांचे नोंदणीकृत संस्थेस प्राधान्याने देण्यात येतील.

(४) **माजी सैनिक.**--जे सैनिक संरक्षण विभागातून सेवानिवृत्त झाले आहेत अथवा ज्यांना युद्धात जखमी झाल्यामुळे सेवानिवृत्ती घ्यावी लागली आहे आणि युद्धात मरण पावलेल्या सैनिकांच्या वीरपत्नी अथवा पत्नी नसल्यास वीरमातेला तसेच ज्या माजी सैनिकांचे वार्षिक उत्पन्न शासन वेळोवेळी जाहीर करेल त्या मर्यादेपेक्षा अधिक नाही अशा व्यक्तींनी पुनर्वसनासाठी बांधलेल्या निवासी अथवा व्यावसायिक गाळ्यांचीमागणी केल्यास अशा व्यक्तींना विशेष प्राधान्य देऊन संबंधित जागा भाडेकराराने देता येईल.

(५) **घटस्फोटित-परित्यक्ता व निराधार महिला.**--ज्या महिला घटस्फोटित व परित्यक्ता आहेत आणि ज्यांचे कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न शासन वेळोवेळी जाहीर करेल त्या मर्यादेपेक्षा अधिक नाही अशा महिलांसाठी पुनर्वसन योजनेतील निवासी अथवा व्यावसायिक गाळ्यांचे २० टक्के आरक्षण करण्यात येऊन ते त्यांना भाडेकरारावर देता येतील.

(६) राष्ट्रपती, राज्यपाल त्याचप्रमाणे द्रोणाचार्य, अर्जुन, शिवछत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू.

(७) **महानगरपालिका सेवक.**--महानगरपालिकेने विहित केलेल्या पद्धतीद्वारे पात्र ठरणाऱ्या महानगरपालिका सेवकांना महानगरपालिका ठरविल त्या अटी व शर्तीच्या अधीन राहून जागेचे भाडेमूल्य आकारून निवासी सदनिका भाडेकराराने देता येतील.

(८) त्या त्या वेळेच्या जाहीर निविदा प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या व्यावसायिक मिळकतीच्या ५० टक्के मिळकतीवर नमूद १ ते ६ प्राधान्य वर्गासाठी (महानगरपालिका सेवक वगळून) आरक्षित असतील व त्या आरक्षित मिळकतीमध्ये प्रत्येक प्राधान्य वर्गासाठीचे प्रमाण प्रत्येकी सारखेच असेल. निवासी गाळ्यांच्या बाबतीत दरवर्षी दिनांक १ एप्रिल रोजी उपलब्ध असलेल्या गाळ्यांच्या ५० पर्यंत टक्के गाळे विस्थापित कुटुंबासाठी राखीव असतील व उर्वरित गाळे वरीलप्रमाणे पात्र महानगरपालिका सेवकांना वितरित करता येतील.

भाग ६

भाडेकराराची मुदत

६. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७९ नुसार

(१) ज्या मिळकतीचे मूल्य रुपये ५०० पेक्षा अधिक नसेल किंवा शासनाचे मान्यतेने महानगरपालिकेने निश्चित केलेल्या मूल्यापेक्षा अधिक नसेल अशा महानगरपालिकेच्या मिळकती महापालिका आयुक्त १२ महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी भाडेकराराने देतील.

(२) महानगरपालिकेच्या ज्या मोकळ्या मिळकती, शाळा, दवाखाने इत्यादी मोठ्या प्रकल्पासाठी प्रिमियमची रक्कम वसूल करून भाडेकराराने संबंधित संस्थेस देण्यात येतील अशा मालमत्तेची व जी मालमत्ता पूर्वी भाडेकराराने देण्यात आलेली आहे, अशा मालमत्तेची भाडेकराराची मुदत, सदर प्रकल्पाची गुणवत्ता लक्षात घेऊन महापालिका आयुक्त हे मुख्यसभेच्या मान्यतेने कमाल ३० वर्ष मर्यादेत निश्चित करतील. जी मालमत्ता पूर्वी भाडेकराराने देण्यात आलेली आहे, अशा मालमत्तेची भाडे कराराची मुदत भाडेकरार अस्तित्वात आल्यापासून अंमलात येईल.

(३) महानगरपालिकेच्या व्यावसायिक व तत्सम इमारतीमधील गाळे प्रिमियमची रक्कम आकारून व मुख्यसभेची मान्यता घेऊन, महापालिका आयुक्त गुणवत्तेनुसार ३० वर्ष मुदतीच्या भाडेकराराने संबंधित संस्थेस देतील. जर असे गाळे दरमहा भाडेकरारान्वये द्यावयाचे असल्यास ते महापालिका आयुक्त मुख्य सभेच्या मान्यतेने ५ वर्षे मुदतीने भाडेकराराने संबंधित संस्थेस देतील.

(४) रस्तारुंदी व तत्सम प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबास निवासी गाळे, मुख्यसभेच्या मान्यतेने द्यावयाचे असल्यास, ते कमाल ५ वर्षे मुदतीच्या भाडेकराराने देण्याचे अधिकार महापालिका आयुक्त यांचेकडे राहतील. तसेच अशा जागा संबंधितांना परस्पर अन्य व्यक्तींना हस्तांतरित करता येणार नाहीत.

(५) महानगरपालिकेच्या ज्या मालमत्ता सार्वजनिक हितासाठी महानगरपालिका व संबंधित संस्था यांचे सहकार्याने संयुक्त प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्यात येतील, त्याची मुदत मुख्य सभेच्या मान्यतेने कमाल ३० वर्षे राहील, मात्र जर असे प्रकल्प व्यवसायाकरिता व करारनाम्यातील अटीनुसार चालविण्यात आले नाहीत, तर ते बंद करून सदर जागा परत घेण्याचे अधिकार महानगपालिका आयुक्त यांचेकडे राहतील.

७. पूर्वी भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जागेस मुदतवाढ देणे

(१) यापूर्वी महानगरपालिकेच्या अनेक इमारतींमधील गाळे तसेच मोकळ्या जागा व्यावसायिक वापरासाठी भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या आहेत, त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे अन्य इमारतींमधील गाळे इतर कारणासाठी विविध मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्यात आलेले आहेत, अशा भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतर नव्याने विहित पद्धतीने प्रिमियमची आकारणी करून मुदतवाढ देण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना राहील.

(२) अशाप्रकारे भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या गाळ्यांची, इमारतींची व जागेची भाडेपट्ट्यांची मुदत संपल्यानंतर मुदतवाढ देताना अशा जागेसाठी, आकारण्यात येणाऱ्या भाड्याची रक्कम करार संपताना असणाऱ्या या मिळकतीच्या या नियमावलीत ठरविल्या जाणाऱ्या विहित मूल्यांकनापेक्षा अथवा त्या मिळकतीसाठी जाहीर निविदा मागविल्या असता येणाऱ्या रकमेपेक्षा कमी असणार नाही.

(३) वरीलप्रकारे संबंधित जागाधारक वाढीव दराने भाडे भरण्यास तयार नसल्यास अगर त्यास दिलेल्या जागेचा वापर त्याने योग्य प्रकारे केले नसल्यास, तसेच अटी शर्तीचा भंग केला असल्याचे निदर्शनास आले असल्यास, अशा जागेचा ताबा संबंधितांकडून आयुक्त तात्काळ काढून घेतील. तसेच असे आदेश जाहीर केल्यापासून ते प्रत्यक्ष ताबा मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी आणि चालू बाजारभावानुसार असलेल्या भाड्याच्या रकमेच्या दीडपट भाडे आकारून त्याची वसुली जमीन महसुलाची थकबाकी म्हणून आयुक्त करू शकतील.

(४) पूर्वी देण्यात आलेल्या जमिनीलगतची मोकळी जागा/रिकामा होणारा गाळा लगतच्या जागाधारकाने/गाळाधारकाने मागणी केल्यास वरील नियमानुसार मूल्यांकन करून विहित पद्धतीचा अवलंब करून प्राधान्याने देता येईल.

भाग ७

जागेची मूल्य आकारणी

८. प्रिमियमची रक्कम पुढीलप्रमाणे ठरविली जाईल

जागेची संपादित केलेल्या वर्षातील किंमत + ताबा दिनांकापासून ते टेंडर दिनांकापर्यंत कालावधीसाठी १२.५ टक्के व्याज + विकसन खर्च अशी प्रिमियमची रक्कम राहील. तसेच भाड्याबाबत दोन पर्याय राहतील. (१) प्रिमियमच्या रकमेच्या २.५ टक्के भाडे दरवर्षी याप्रमाणे ३० वर्षांपर्यंत राहील. (२) ३० वर्षाचे भाडे एकरकमी भरण्यास तयार असल्यास दरवर्षीचे भाडे, दरवर्षीचे भाडे १००/८ या सूत्राद्वारे होणारी रक्कम एकरकमी भरावी लागेल व दरवर्षी रुपये १ नाममात्र भाडे महानगरपालिकेच्या स्वामित्वापोटी भरावे लागेल.

(१) ज्या जागा ६० चौरस फूटापेक्षा मोठ्या कालावधीकरिता मालमत्ता भाडेकराराने वाटप करावयाच्या आहेत अशा प्रत्येक मालमत्तेच्या प्रिमियम अथवा भाडेपट्ट्याचा दर वरीलप्रमाणे नगर अभियंता यांचेकडून निर्धारित करून घेऊन त्याप्रमाणे आकारणी करण्यात येईल व ६० चौरस फूटापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या जागा अथवा गाळ्यांचे भाडे ठरविताना मूल्यांकनाच्या ५० टक्के कमी दराने भाडे आकारण्यात यावे अथवा त्या दराने प्रिमियमची रक्कम निश्चित करण्यात यावी. अशा मोकळ्या जागा अथवा गाळ्यांचे भाडे दर तीन वर्षांनी १२ टक्के वाढविण्यात यावे.

(२) महानगरपालिकेच्या ज्या मिळकती एखाद्या संस्थेस/व्यक्तीस नगर अभियंता यांचे मूल्यांकनानुसार भाडेकराराने देण्यात येतील, अशा कार्यवाहीमध्ये संबंधित संस्थेने ६ महिन्याचे अथवा नगररचना विभागाच्या धोरणानुसार भाड्याएवढी अनामत महानगरपालिकेकडे भरणे आवश्यक आहे.

(३) हे मूल्यांकन करीत असताना "ना नफा-ना तोटा" तत्त्वावर चालणाऱ्या संस्था, शैक्षणिक संस्था, क्रीडा संस्था, सामाजिक कार्य करणाऱ्या सार्वजनिक संस्था, ट्रस्ट इत्यादींना भाड्यामध्ये/प्रिमियममध्ये ५० टक्केपेक्षा अधिक नाही, इतकी सवलत स्थायी समिती व मुख्य सभेच्या संमतीने देता येईल. तथापि, अशाप्रकारे सवलत घेतलेल्या संस्थांवर जागा वापराबाबत योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी, शर्ती व निर्बंध लादण्याचा अधिकार आयुक्तास असेल.

(४) वाहनतळ, व्यायामशाळा, तलाव इत्यादी प्रकारच्या व्यक्तिगत लाभ घेतला जात असणाऱ्या मिळकतींच्या बाबतीत या सुविधांचा लाभ घेऊ शकणाऱ्या व्यक्तींची महत्तम संख्या ठरवून व प्रति व्यक्ती दर निश्चित करून त्याप्रमाणे येणाऱ्या रकमेच्या ५० टक्के इतकी रक्कम निविदा काढताना किमान भाडे म्हणून निश्चित करण्यात येईल.

भाग ८

मिळकत/मालमत्ता वाटपाच्या प्रमुख शर्ती

(९) महानगरपालिकेची एखादी मालमत्ता एखाद्या संस्थेस/व्यक्तीस भाडेकराराने वाटप करण्यात आली असेल अशी मालमत्ता संबंधित संस्थेने/व्यक्तीने महापालिका आयुक्त यांचे मान्यतेशिवाय गहाण ठेवणे, विकणे, पोट-भाड्याने अथवा अन्यरितीने अन्य संस्थेस/व्यक्तीस हस्तांतरित करणे अनुज्ञेय राहणार नाही.

(१०) महानगरपालिकेची मिळकत एखाद्या संस्थेस/व्यक्तीस भाडेकराराने हस्तांतरित करण्यात आली असल्यास संबंधित जागेचा वापर, संबंधित संस्था अगर व्यक्तीने ताबा दिल्याचे दिनांकापासून ६ महिन्यांचे आत करणे त्यांचेवर बंधनकारक राहील. तसेच मोठ्या क्षेत्राची जागा प्रकल्पासाठी दिलेली असल्यास तेथे जास्तीत जास्त २ वर्षात इमारत बांधून प्रकल्पाचे काम सुरू करणे आवश्यक आहे.

(११) ज्या संस्थेस/व्यक्तीस महापालिकेची जागा मंजूर झाली असेल त्याने ज्या महानगरपालिकेच्या मिळकतीच्या प्रिमियमचा अनामत रकमेचा भरणा पूर्णपणे एक महिन्याचे आत भरणे आवश्यक आहे अथवा संबंधित संस्थेने/व्यक्तीने प्रिमियमची रक्कम हप्त्याने भरण्याची मागणी केल्यास सर्वसाधारण संस्थेस/व्यक्तीस वार्षिक ३ हप्ते व मागासवर्गीय/अपंगांचे संस्थेस जास्तीत-जास्त ५ हप्ते मंजूर करण्यात येतील. अशारितीने पहिला हप्ता भरल्यानंतर व आवश्यक तो करारनामा केल्यानंतर संबंधित जागेचा ताबा महानगरपालिकेकडून देण्यात येईल. या पद्धतीने वार्षिक हप्ता कालावधीसाठी ठरविल्यानंतर वार्षिक १२ टक्के या दराने व्याज आकारण्यात येईल.

(१२) महानगरपालिकेची जागा भाडेपट्ट्याने देताना संबंधित संस्था/व्यक्तीने महानगरपालिकेबरोबर जो करारनामा केला असेल त्यातील कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास, त्यांचेकडून सदर जागा काढून घेण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना राहील. तसेच अशा प्रकरणी प्रिमियमची रक्कम जप्त करण्याचे अधिकारही महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

(१३) वरील शर्तींशी सुसंगत अशा अन्य काही अटी व शर्ती ठरविण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना राहील.

(१४) यापैकी कोणत्याही अटी व शर्तींचे, नियमांचे उल्लंघन झाल्याची आयुक्तांची खात्री झाल्यास करारदारास संबंधित मिळकतीमधून निष्कासित करण्याचा तसेच निष्कासित करून प्रत्यक्ष जागेचा ताबा मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी वरील नियमाप्रमाणे दंडनीय भाडे वसूल करण्याचा अधिकार आयुक्तांना राहील.

भाग ९

मिळकत वाटपाची पद्धती

(१५) महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील शाळा, रुग्णालये व तत्सम मोठ्या प्रकल्पांसाठीच्या मोकळ्या व बाधीत जागावर संबंधित प्रकल्प करण्यास महापालिका असमर्थ असेल तर अशा मोकळ्या जागा दीर्घ मुदतीचे भाडेपट्ट्याने व प्रिमियमची रक्कम आकारून देण्यासाठी जाहीर निविदा मागवून संबंधित संस्थांकडून अर्ज मागविण्यात येतील.

(१६) निविदेतील अटीनुसार पात्र संस्थापैकी कमाल प्रिमियमची रक्कम भरण्यास समर्थ असलेल्या संस्थेस जागा देण्याची शिफारस महानगरपालिका आयुक्त मुख्य सभेस करतील.

(१७) महानगरपालिका मुख्य सभेची रीतसर मान्यता प्राप्त झाल्यानंतर निवड झालेल्या संस्थांकडून प्रिमियमची रक्कम भरून घेऊन आणि रीतसर करारनामा केल्यानंतर संबंधित मिळकतीचा ताबा सदर संस्थेस देण्यात येईल.

(१८) महानगरपालिकेच्या ताब्यातील व्यावसायिक गाळे नागरिकांकडून/संस्थांकडून जाहीर निविदा मागवून भाडेकराराने देण्यात येतील. जास्तीत-जास्त भाडे रक्कम देऊ इच्छिणाऱ्या व महापालिकेच्या शर्तीनुसार पात्र अशा संस्थांची, नागरिकांची निवड करण्यात येईल व अशा निवड झालेल्या संस्थांबाबत महापालिका मुख्य सभेची मान्यता घेऊन, त्यांचेकडून रीतसर करारनामा करून, प्रिमियम रक्कम भरण्यात आल्यानंतरच जागेचा ताबा देण्यात येईल.

(१९) महानगरपालिकेच्या शाळांच्या इमारतीमधील काही वर्ग खोल्या शैक्षणिक वापरासाठी अन्य संस्थांना भाडेपट्ट्याने द्यावयाचे झाल्यास, त्या वर्ग खोल्या निविदा मागवूनच भाडेपट्ट्याने देण्यात येतील.

(२०) महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या मिळकतींपैकी काही मिळकती अंध, अपंग यांच्यासाठी देण्याचे आयुक्त यांनी स्थायी समितीच्या मान्यतेने ठरविल्यास अंध, अपंग व्यक्ती किंवा त्यांच्या संस्थांकडून जाहीर प्रगटनाद्वारे अर्ज मागविण्यात येतील. सदर अर्जाची छाननी करण्यात येऊन त्यांचे पात्रतेसंबंधात शासनाच्या समाजकल्याण विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील. त्यातील पात्र व्यक्ती व संस्था यांना मुख्य सभेच्या मान्यतेने, रीतसर करारनामा करून आणि ६ महिन्याचे भाड्याच्या रकमेएवढी अनामत रक्कम स्वीकारून, एक महिन्याचे भाडे घेऊन अथवा प्रिमियमची रक्कम घेऊन ताबा देण्यात येईल.

(२१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधीव निवासी गाळे, महानगरपालिकेच्या ताब्यात मालकीहक्काने आलेले आहेत, अशा निवासी गाळ्यांचे वाटप झोपडपट्टीधारक, रस्तारुंदी व विकास योजना आरक्षणामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांना करण्यात येईल. अशा जागांसाठी, ज्या व्यक्तीकडून महानगरपालिकेकडे मागणी करण्यात येईल त्यांच्या पात्रतेबाबत खातरजमा करण्यात येऊन, त्यासाठी मुख्य सभेची मान्यता घेण्यात येईल. त्यानंतर सदर जागा रीतसर करारनामा करून व अनामत रक्कम स्वीकारून भाडेपट्ट्याने देण्यात येईल. ही प्रक्रिया होईपर्यंत सदर गाळे ११ महिन्याच्या कराराने तात्पुरत्या स्वरूपात संबंधित कुटुंबास देणेचा अधिकार आयुक्तांना राहील.

(२२) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राखीव गाळे वगळून महानगरपालिकेकडे मालकीहक्काने उपलब्ध असलेल्या गाळ्यापैकी ५० टक्केपर्यंत निवासी गाळे विहित पद्धतीद्वारे पात्र ठरणाऱ्या महानगरपालिका सेवकांना वरील अटी शर्तींच्या अधीन राहून दीर्घ मुदतीच्या कराराने मुख्य सभेच्या मंजुरीने देता येतील.

भाग १०

संयुक्त प्रकल्प

(२३) महानगरपालिकेच्या जागेवर अगर इमारतीमध्ये संयुक्त प्रकल्प राबविण्यासाठी जाहीर निविदा मागवून जास्तीत-जास्त मोबदला देणाऱ्या व्यक्ती/संस्थेस नेमून त्यांच्या सहकार्याने संयुक्त प्रकल्प राबवता येईल. जर प्रकल्प व अव्यावसायिक/समाजोपयोगी (Not for Profit) असेल तर जाहीर निवेदनाद्वारे अर्ज मागवून सुयोग्य व्यक्ती/संस्थेची निवड करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील. व्यायामशाळा, समाज मंदिरे, अभ्यासिका व तत्सम कारणाकरिता महानगरपालिका अथवा आमदार, खासदार निधीमधून बांधण्यात येणाऱ्या इमारती ज्यांचा उपयोग सर्वसामान्य नागरिकांसाठी केला जातो, त्या मागे कोणत्याही व्यावसायिक उत्पन्नाचा हेतू नसतो अशा बांधलेल्या जागा त्या भागातील नागरिकांच्या वापरासाठी खालीलप्रमाणे देता येतील.

(१) १५०० चौरस फुटापर्यंत बांधकाम केलेल्या व्यायामशाळा, अभ्यासिका, समाज मंदिर व तत्सम इमारत ज्या वॉर्डात किंवा प्रभागात असेल अशा प्रभागातील/वॉर्डातील सामाजिक काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडून अर्ज स्वीकारून, अशा संस्थांना व्यवस्थापन व देखभालीसाठी स्थायी समितीमार्फत मुख्य सभेच्या मान्यतेने देता येतील.

(२) व्यवस्थापन व देखभाल यावरील येणारा खर्च भागविण्यासाठी योग्य ते शुल्क आकारण्याची संस्थेस मुभा राहील. तथापि, हे शुल्क निश्चित करताना आयुक्तांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल.

(३) अशाप्रकारे संयुक्त प्रकल्प राबवित असताना संबंधित संस्थेकडून महानगरपालिकेस व देय होणाऱ्या मोबदल्याचे स्वरूप महापालिका आयुक्त स्थायी समितीचे मान्यतेने ठरवतील व ते संबंधित व्यक्ती/संस्थेस बंधनकारक असेल.

(४) या संस्थांना किमान ५ वर्ष व्यवस्थापन व देखभाल पाहण्याकरिता देण्यात येईल. या संबंधित व्यक्ती/संस्थांनी महानगरपालिका अटी व नियमांचे पालन न केल्यास त्यांचे व्यवस्थापन काढून घेण्याचा अधिकार आयुक्तांना राहील.

भाग ११

महानगरपालिकेच्या मिळकतीचे हस्तांतरण

(२४) महानगरपालिकेच्या कोणत्याही मिळकती अथवा बांधीव गाळे ज्या संबंधित संस्था/व्यक्ती यांना दीर्घ मुदतीचे भाडेकराराने विशिष्ट कारणासाठी देण्यात आल्या असतील अशा मिळकती संबंधित संस्था/व्यक्ती महापालिकेच्या परवानगीशिवाय परस्पर पोट-भाड्याने अन्य संस्था/व्यक्ती यांना देणे अनुज्ञेय होणार नाही.

(२५) वर उल्लेख केलेल्या मिळकतींची संबंधित संस्था/व्यक्ती यांना आवश्यकता नसेल तर त्या महापालिकेस परत करणे आवश्यक असेल अथवा ज्या विशिष्ट हेतूच्या दृष्टीने अशा मिळकतीचे वाटप करण्यात आले असेल त्या हेतूबाबत पात्र असणाऱ्या संस्था/व्यक्ती यांना महापालिकेची पूर्वपरवानगी घेऊन अशा मिळकती उर्वरित करार कालावधीसाठी हस्तांतरित करता येतील. मात्र अशा हस्तांतरणासाठी संबंधित जागेचे मूल्य व पूर्वीच्या संस्था/व्यक्ती यांचेकडून आकारण्यात आलेले मूल्य यांच्यातील फरकांचे निवासी वापरासाठी २५ टक्के व व्यापारी वापरासाठी ५० टक्के हस्तांतरण फी आकारण्यात येईल. तसेच ज्या संस्थेस/व्यक्तीस संबंधित मिळकत हस्तांतरित करावयाची आहे अशा संस्था/व्यक्ती यासाठी मुख्य सभेची मान्यता घेऊन व पुन्हा त्यांचेबरोबर रीतसर करारनामा करून घेऊन आणि हस्तांतरण फी भरून घेऊन असे हस्तांतरण करण्यात येईल.

भाग १२

तरतुदींचा अर्थ लावणे व शास्ती

(२६) वरील नियमात काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही जागा/मिळकतींचा विनियोग विस्थापित व्यक्ती आणि केंद्र/राज्य शासनाची कार्यालये/अंगीकृत उपक्रम व उक्त नियमातील २३ *(१)* मधील मिळकती वगळता जाहीर निविदा मागवूनच करण्यात येईल.

(२७) या नियमातील तरतुदींचा अर्थ लावणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरिता उचित अटी/शर्तींचे करार करणे, त्याचे अनुपालन न झाल्यास विहित पद्धतीने शास्ती लादणे इत्यादींबाबत आयुक्त यांचा अधिकार अंतिम असेल.

प्रवीणसिंह परदेशी,

महानगरपालिका आयुक्त,

पुणे महानगरपालिका, पुणे.

पुणे, २१ फेब्रुवारी २००८.

महाराष्ट्र शासनाचे साप्ताहिक राजपत्र हे मुद्रक - प्रकाशक नरेश महादेवराव गोटे, व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, येरवडा, पुणे-६ यांनी शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे अखत्यारीत येरवडा कारागृह मुद्रणालय, कारागृह आवार, येरवडा, पुणे-६ येथे छापून प्रसिद्ध केले.